महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४४७५/४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/ थेट द्वितीय वर्ष पदविका /२०२५/ २९६ दिनांक : ०५/०७/२०२५

**प्रवेशासाठीचे वेळापत्रक**
**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम**

संदर्भ : क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२५/ थेट द्वितीय वर्ष पदविका /कॅप फेरी/२८५, दिनांक : ०२/०७/२०२५

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता पुर्णवेळ थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे आणि अर्ज निश्चित करणे या प्रक्रियेसाठी दि. ०५/०७/२०२५ ही शेवटची तारीख करण्यात येऊन त्यापुढील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे पुढील सविस्तर वेळापत्रक संदर्भीय सुचनेनुसार घोषित करण्यात आलेले आहे.

विद्यार्थ्यांची मागणी विचारात घेऊन, या प्रवेशप्रक्रियेसाठी उमेदवारांद्वारे संकेतस्थळावरुन अर्ज नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे व प्रवेशासाठी कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज भरल्याची निश्चिती करण्यासाठी दि. ०६/०७/२०२५ ते दि. ०८/०७/२०२५ या कालावधीत अधिकची संधी देण्यात येत आहे. दि. ०८/०७/२०२५ पर्यंत अर्ज सादर करणाऱ्या व निश्चित करणाऱ्या सर्व उमेदवारांचा समावेश केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम गुणवत्ता यादी मध्ये करण्यात येईल. या उमेदवारांना हरकती सादर करण्यासाठी कालावधी (Grievance Period) राहणार नाही. दि. ०८/०७/२०२५ नंतर नोंद होणारे, पडताळणी व निश्चित होणारे अर्ज संस्था स्तरावरील जागांसाठीच विचारात घेतले जातील.

उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई